# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२८२८९९६, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : www.mjp.maharashtra.gov.in

## परिपत्रक क्र.१८०

**विषय:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यात येत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांकरिता वार्षिक कृती आराखडा तयार करणेबाबत.

**संदर्भ:** शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-०७ दि.१७.१०.२०१४

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी राज्यस्तरावर केंद्रीय अनुदानाच्या १५% व तेवढाच राज्य शासनाचा निधी उपलब्ध करुन देण्याविषयीची तरतूद असून, हा निधी राज्यस्तरावर मजीप्राला/ जिल्हा परिषदेला वेळोवेळो वितरीत केला जातो. निधी उपलब्ध झाल्यानंतर, सदर निधी कोणत्या योजनांसाठी वापरावा याचे निश्चितीकरण करणे, अंदाजपत्रक तयार करणे, त्यास तांत्रिक मंजूरी देणे, प्रशासकीय मंजूरी प्राप्त करुन घेणे इ. साठी वेळ लागतो.

पूर्ण झालेल्या तथापी स्थानिक स्वराज्य संस्थेने हस्तांतरीत करुन न घेतलेल्या ३० ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे. या योजनांवरील खर्चाच्या तुलनेने वसूल होणारी पाणीपट्टी अतिशय कमी आहे. देखभाल व दुरुस्तीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे कुठलाही निधी उपलब्ध नाही. त्यामुळे या योजनांची देखभाल व दुरुस्ती करणे दिवसेंदिवस जिकिरीचे होत आहे. या बाबींचा विचार करता, संदर्भिय शासन निर्णयामध्ये उल्लेख केल्यानुसार, या योजनांच्या निधीसाठीची तरतूद वार्षिक कृती आराखड्यामध्ये करणे आवश्यक आहे.

प्रत्येक वर्षी ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत वार्षिक कृती आराखडा तयार करुन, त्यानुसार निधी उपलब्ध करुन घेण्यात येतो. त्याच धर्तीवर मजीप्रामार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यात येणाऱ्या ग्रामीण योजनांच्या बाबतीतही वार्षिक कृती आराखडा तयार करुन सादर करण्याची कार्यवाही करावी.

(कृ.मा.प.)

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या तसेच ग्रामीण योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठीचा वार्षिक कृती आराखडा क्षेत्रिय कार्यालयाकडून वेळीच तयार करुन घेणे, त्याचे संकलन करणे व संचालक (वित्त) यांच्या तपासणीनंतर सदस्य सचिव, मजीप्रा यांची मान्यता घेऊन पाणी पुरवठा व स्वच्छता संस्था (वासो) मार्फत शासनास सादर करणे इ. सर्व कार्यवाही नियोजनपूर्वक करावयाचे आहे. याचे संनियंत्रण अधीक्षक अभियंता, म.नि.सं.व सं. कक्ष, ठाणे यांचेमार्फत करण्यात यावे. त्याचप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यात आलेल्या योजना मंजूर करुन घेण्यासाठी व निधीच्या उपलब्धतेसाठी संबंधीत अधीक्षक अभियंता यांनी पाठपुरावा करावा.

वरील सूचनांची या परिपत्रकाच्या दिनांकापासून तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. सूचनांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर म.ना.से. नियमामधील तरतूदीनुसार प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

९c **(संतोष कुमार)**
**सदस्य सचिव**

**जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-२/३५०/४६३**
**दि.२० एप्रिल, २०१६**
**प्रत माहिती व अनुपालनाच्या कार्यवाहीसाठी :**

- संचालक (तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे / पुणे / नाशिक / औरंगाबाद /नागपूर / अमरावती.
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, म.नि.सं. व सं. कक्ष, ठाणे
- अधीक्षक अभियंता, गु.प.प., महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे
- अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ, ठाणे/पनवेल/पुणे/सांगली/औरंगाबाद/लातूर/नांदेड/नाशिक/अहमदनगर/अमरावती/अकोला/नागपूर/चंद्रपूर.
- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वि., ठाणे/ अंबरनाथ (जव्य)/ विरार(जव्य)/ पनवेल (जव्य)/ माणगांव/ रत्नागिरी/ सिंधुदूर्गनगरी/ पुणे-१/ पुणे-२/ कराड/सातारा(जव्य)/सांगली/कोल्हापूर/सोलापूर/औरंगाबाद/ बीड/ जालना/ लातूर/ उस्मानाबाद/ नांदेड/ परभणी/ जळगाव/ नाशिक/ नाशिक (जव्य)/ अहमदनगर/ संगमनेर/ अमरावती/ अमरावती (जव्य)/ यवतमाळ/ अकोला/ वाशिम / बुलढाणा/ नागपूर/ नागपूर (जव्य)/ गोंदिया/ चंद्रपूर/वर्धा.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई-२१ स्वागत 21 APR 2016